के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक
**के. के. वाघ कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय**
(महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्न)
सरस्वतीनगर, मुंबई-आग्रारोड, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३
दूरध्वनी क्रमांक - (०२५३) २५५५२४१
ईमेल:- principal-bscbiotech@kkwagh.edu.in

==========================================================

**जा. क्रं.: के. के. वाघ/ कृषि जैवतंत्रज्ञान/**2८७**/२०२१** दिनांक:- ०५/०५/२०२१

## महत्वाची सुचना

**संदर्भ:-** जा.क्र.विद्या-९/ऑनलाईन परिक्षा/९५६/सन २०२०, दि. ०४/०५/२०२१

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील सत्र १,३,५,७ व ८ च्या अंतिम सत्र ऑनलाईन **लेखी** परीक्षेचा निकाल आज दि. ०५/०५/२०२१ रोजी विद्यापीठाने जाहिर केलेला असुन, महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांनी सदर निकालाचे अवलोकन करावे.

सदर ऑनलाईन परीक्षेमध्ये अनेक विद्यार्थ्यांना अडचणी आल्या होत्या. त्यामुळे जे विद्यार्थी सदर निकाला बाबत असमाधानी/ तक्रारी असतील त्यांची पुन्हा परिक्षा घेण्याबाबत वरील संदर्भीय पत्रान्वये महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी कळविले आहे. त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या निकालाचे अवलोकन करावे व निकालाबाबत असमाधानी/तक्रारी असल्यास सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये माहिती महाविद्यालयास दि. ०६/०५/२०२१ रोजी पर्यत मेलद्वारे (disp-bscbiotech@kkwagh.edu.in) सादर करावी.

ज्या विद्यार्थ्यांना कोविड - १९ अथवा इतर तांत्रिक कारणांमुळे विहित मुदतीत अर्ज सादर करणे शक्य होणार नाही अशा विद्यार्थ्यांनी आपल्या समुदपदेशकांसोबत विहित मुदतीतच संपर्क साधावा.

ज्या विद्यार्थ्यांनी पुन्हा होणाऱ्या लेखी परिक्षेसाठी यापुर्वी अर्ज सादर केलेले आहे अशा विद्यार्थ्यांचे अर्ज या सुचनेद्वारे रद्द करण्यात येत आहे. दि. ०५/०५/२०२१ ते दि. ०६/०५/२०२१ या कालावधी मध्ये अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांचीच नावे पुन्हा होणाऱ्या **लेखी** परिक्षेसाठी विचाराधीन असतील याची सर्व विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

College of Agricultural Bio-tech, K.K. Wagh, NASHIK 422 003

प्राचार्य
Principal,
K.K.Wagh College of Agricultural
Bio-Technology, Nashik.

अर्जदार :-
नोंदणी क्रमांक:-
मोबाईल क्रमांक:-
ईमेल आयडी :-
दिनांक :-

प्रति,

मा. प्राचार्य,
के. के. वाघ ...................................... महाविद्यालय
सरस्वतीनगर, नाशिक.

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१, सत्र ......... ऑनलाईन **लेखी** परिक्षेच्या निकाला बाबत असमाधानी/ तक्रारी असल्या बाबत ...

**संदर्भ:-** जा.क्र.विद्या-९/ऑनलाईन परिक्षा/९५६/सन २०२०, दि. ०४/०५/२०२१

मा. महोदय,

शैक्षणिक वर्ष २०२०-२१, सत्र ......... ऑनलाईन लेखी परिक्षा दि. /०२/२०२१ ते दि. /०३/२०२१ या कालावधीत संपन्न झालेली आहे. सदर ऑनलाईन परिक्षे दरम्यान अनेक तांत्रिक अडचणीमुळे खालील विषयांची परिक्षा दिलेली असुन देखील ऑनलाईन पेपर सबमिट झालेली नाही. तसेच परिक्षे दरम्यान उद्भवलेल्य तांत्रिक अडचणीमुळे वेळेचा अपव्यय झाल्या कारणांने खालील विषयांच्या परिक्षेबाबत/ निकाला बाबत मी असमाधानी / तक्रारी आहे.

सबब वरील संदर्भीय पत्रांनुसार आपणांस विनंती करतो/ करते की, माझी खालील विषयांची लेखी परिक्षा पुन्हा देण्याची संधी मला मिळावी.

| सत्र | आयडी | पासवर्ड | कोर्स कोड |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

मी सादर केलेल्या अर्जाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे संपुर्ण अधिकार महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांना आहेत याची मला पुर्ण जाणीव आहे.

आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

आपला/ आपली विश्वासु,